शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे !!
आतील पानांत

दैनिक
# निळे प्रतिक



मुख्य संपादक - रतनकुमार साळवे
एम.ए. (एम.सी.जे) एम.ए. (फुले-डॉ. आंबेडकर थॉट),
एम.ए. (पाली ॲण्ड बुद्धिझम)
मो. ९९२३५०२३२०

• दैनिक • छत्रपती संभाजीनगर • वर्ष-१ • अंक - १९१ • रविवार, दि. २२ डिसेंबर २०२४ • पाने ४ • किंमत ५ रूपये

# डॉ. बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभेचा विरोध होता

## प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई/प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी (१७ डिसेंबर) राज्यसभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्याचे सर्वत्र पडसाद उमटताना दिसत आहेत. या वक्तव्यावरून राजकीय वातावरण देखील चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. विरोधकांकडून अमित शाह व केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली जात आहे.

दरम्यान, विरोधकांच्या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्युत्तर दिलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्ट्समध्ये काँग्रेसने कशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केला याबद्दल काही दावे केले आहेत.

मोदींनी यावेळी काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निवडणुकीत दोन वेळा पराभव केल्याचा पुनरुच्चार केला आहे. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली



आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी त्या पराभवासाठी मी काँग्रेसला दोष देणार नाही असं म्हटलं आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्यानंतर अमित शाह यांनी आता माफी मागावी अशी मागणी विरोधक करत आहेत. मात्र, सत्ताधारी भाजपा काँग्रेसवर आरोप करत आहे. तसेच काँग्रेसनेच बाबासाहेबांचा अपमान केला, त्यांना निवडणुकीत हरवलं असे दावे करत आहेत.

दरम्यान, काही माध्यमं देखील त्यासंबंधीच्या बातम्या दाखवत आहेत. हा सगळा प्रकार पाहून प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजपा लोकांचं लक्ष वळवण्याचा प्रयत्न करत आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत पत्रकाराने मला विचारले की, बाबासाहेबांना अधिक अपयशी कोणी केले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-भाजपा की काँग्रेसने? बाबासाहेबांच्या आरक्षण धोरणाला काँग्रेसने विरोध केला होता हे खरे आहे.

पण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभेनेही बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलाला विरोध केला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-भाजपा आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष बाबासाहेबांच्या आर्थिक धोरणाचे पालन करण्यात अपयशी ठरले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-भाजपा स्वतःहून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत आणि काँग्रेसवर दोषारोप करणे म्हणजे भांडे किटलीला काळे म्हणत आहे.

**भाजपाच्या दाव्यावर प्रकाश आंबेडकर नेमकं काय म्हणाले?**

मुंबई आणि भंडारा येथील निवडणुकींमध्ये काँग्रेसच्या उमेदवाराकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव झाल्याबद्दल आपण काँग्रेसला दोष द्यायला तयार नसल्याचे प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत. त्यांनी सांगितलं की, ङ्गमी काँग्रेसला दोष द्यायला तयार नाही. कारण काँग्रेस हा राजकीय पक्ष आहे आणि त्या पक्षाचे त्यावेळचे धोरण होते.

फक्त काँग्रेस पक्षच नव्हता तर कम्युनिस्ट पक्षानेदेखील विरोध केला होता. कामगार लढ्यात एकत्र लढल्यानंतरही कम्युनिस्ट पक्षाने स्वतःची ६० हजार मतं मध्य मुंबई मतदारसंघात कुजवली होती.

# अखेर महायुती सरकारचे खातेवाटप जाहीर

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई : महायुती सरकारचे खातेवाटप जाहीर झाले असून गृहमंत्रालय देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवले आहे. याशिवाय गृह, ऊर्जा, न्याय व विधी, सामान्य प्रशासन, माहिती व प्रसारण व खातेवाटप न झालेल सर्वच खाते फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवले आहेत. तर नगरविकास मंत्रालय एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. याशिवाय ग्रामविकास मंत्रालय, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग ही एकनाथ शिंदेंना मिळाली आहेत. तर अर्थमंत्रालय आणि राज्य उत्पादन शुल्क ही खाती अजित पवार यांच्याकडेच राहिले आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे महसूल खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास विभाग, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ आणि गिरीश महाजन यांच्याकडे डे जलसंपदा विभागाची धुरा देण्यात आली आहे.

तर दुसरीकडे प्रताप सरनाईक फडणवीस सरकारमध्ये परिवहन विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. परिवहन विभागासाठी भरतशेठ गोगावले यांनी मागणी केली होती मात्र त्यांच्या जागी प्रताप सरनाईक यांना जबाबदारी देण्यात आली आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांना फक्त गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचा कारभार देण्यात आला आहे. विखे पाटील यांचे महत्त्व नव्या मंत्रिमंडळात कमी झाल्याचे दिसून येत आहे.

शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सार्वजनिक बांधकाम विभाग हे महत्वाचे खाते देण्यात आले आहे आणि पहिल्यांदा मंत्री झालेले प्रकाश आबिटकर यांना आरोग्य सारखे मोठे खाते मिळाले आहे. तर दादा भुसे हे आता नवीन शिक्षण मंत्री असतील. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांच्याकडे वैद्यकीय शिक्षण विभाग देण्यात आले आहे.

तर गुलाबराव पाटील यांच्याकडे पाणीपुरवठा, गणेश नाईक यांच्याकडे वन, संजय राठोड यांच्याकडे माती व पाणी परीक्षण, धनंजय मुंडे यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, मंगलप्रभात लोढा यांच्याकडे कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन, उदय सामंत यांच्याकडे उद्योग व मराठी भाषा, जयकुमार रावल यांच्याकडे विपणन, प्रोटोकॉल, पंकजा मुंडे यांच्याकडे पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन, अतुल सावे यांच्याकडे ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतनीकर, अशोक उईके यांच्याकडे आदिवासी विकास मंत्रालय, शंभूराज देसाई यांना पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय, आशिष शेलार यांच्याकडे माहिती व तंत्रज्ञान, दत्तात्रय भरणे यांच्याकडे क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, अदिती तटकरे यांच्याकडे महिला व बालविकास, माणिकराव कोकाटे यांच्याकडे कृषी विभाग, जयकुमार गोरे यांच्याकडे ग्रामविकास, पंचायत राज, नरहरी झिरवाळ यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन, संजय शिरसाट यांच्याकडे सामाजिक न्याय, भरत गोगावले यांच्याकडे रोजगार हमी,फलोत्पादन विभाग देण्यात आले आहे.

कॅबिनेट मंत्री

१.चंद्रशेखर बावनकुळे – महसूल
२.राधाकृष्ण विखे पाटील – जलसंधारण (गोदावरी व कृष्णा खोरे विकास)
३.हसन मुश्रीफ – वैद्यकीय शिक्षण
४.चंद्रकांत पाटील – उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री
५.गिरीश महाजन – जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन
६.गुलाबराव पाटील – पाणीपुरवठा
७.गणेश नाईक – वन
८.दादाजी भुसे – शालेय शिक्षण
९.संजय राठोड – माती व पाणी परीक्षण
१०.धनंजय मुंडे – अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण
११.मंगलप्रभात लोढा – कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन
१२.उदय सामंत – उद्योग व मराठी भाषा
१३.जयकुमार रावल – विपणन, प्रोटोकॉल
१४.पंकजा मुंडे – पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन
१५.अतुल सावे – ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतनीकर
१६.अशोक उईके – आदिवासी विकास मंत्रालय
१७.शंभूराज देसाई – पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय
१८.आशिष शेलार – माहिती व तंत्रज्ञान
१९.दत्तात्रय भरणे – क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय
२०.अदिती तटकरे – महिला व बालविकास
२१.शिवेंद्रराजे भोसले – सार्वजनिक बांधकाम
२२.माणिकराव कोकाटे – कृषी
२३.जयकुमार गोरे – ग्रामविकास, पंचायत राज
२४.नरहरी झिरवाळ – अन्न व औषध प्रशासन
२५.संजय सावकारे – कापड
२६.संजय शिरसाट – सामाजिक न्याय
२७.प्रताप सरनाईक – वाहतूक
२८.भरत गोगावले – रोजगार हमी, फलोत्पादन
२९.मकरंद पाटील – मदत व पुनर्वसन
३०.नितेश राणे – मत्स्य आणि बंदरे
३१.आकाश फुंडकर – कामगार
३२.बाबासाहेब पाटील – सहकार
३३.प्रकाश आबिटकर – सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण

**राज्यमंत्री**

३४. माधुरी मिसाळ – सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण
३५. आशिष जयस्वाल – अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय
३६. मेघना बोर्डीकर – सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा
३७. इंद्रनील नाईक – उच्च आणि तंत्र शिक्षण, आदिवासी विकास आणि पर्यटन
३८. योगेश कदम – गृहराज्य शहर
३९. पंकज भोयर – गृहनिर्माण

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी जे कोणी जबाबदार आहेत योग्य प्रकारचा धडा शिकवल्याशिवाय शांत बसायचं नाही

## शरद पवारांचा मस्साजोगमधून सरकारला इशारा

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**बीड/प्रतिनिधी**

ज्येष्ठ नेते शरद पवारांनी आज बीडमधील मस्साजोग या गावी जाऊन या गावचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट सांत्वनपर भेट घेतली. यावेळी उपस्थितांशी संवादही साधला. त्यानंतर त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की संतोष देशमुख यांच्या हत्येने सर्वसामान्य लोकांना धक्का बसलाय. बीड जिल्ह्याचा महाराष्ट्रात एक लौकिक आहे. मी अनेक वर्षापासून या ना त्या निमित्ताने या जिल्ह्याची संबंधित आहे. वारकरी संप्रदाय हे या जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. त्या वारकरी संप्रदायाचा विचार घेऊन आपले आयुष्य जगणारे, दुष्काळ काळात त्याला तोंड देणारे, महाराष्ट्राच्या साखर उद्योगाला हातभार लावणारे आणि त्याप्रती कष्ट करणारे कुणी आहेत हा प्रश्न विचारला तर बीडचा उल्लेख हा केला जातो. अशा जिल्ह्यात जे काही घडलं हे कोणालाही न पटणारं, न शोभणारं अतिशय चमत्कारीक कशा प्रकारचं आहे.

शरद पवार म्हणाले, ङ्गज्या तरुण सरपंचाची हत्या झाली. पंधरा वर्ष लोकांचा पाठिंब्याने त्या पदावर बसण्याचं काम ज्यांनी केलं. पंधरा वर्ष ज्याअर्थी निवड झाली त्याचा अर्थ लोकांच्या दैनंदिन सुखदुःखाची समरस होणारा, वादविवादापासून दूर राहणारा असा हा तरुण, कर्तबगार लोकप्रतिनिधी म्हणून तुमच्या गावांमध्ये काम करतोय. जे काही घडलं त्याच्यात त्यांचा काही संबंध नसताना, कोणी येऊन कोणाला दमदाटी केली. कोणाला मारहाण केली आणि त्याच्याबद्दलची तक्रार आल्यानंतर त्याची चौकशी करण्याची भूमिका घेतली आणि ती चौकशी का करतोय म्हणून कुणी बाहेरून येतं, व्यक्तिगत हल्ला केला जातो आणि शेवटी तो हल्ला हत्येपर्यंत जातो हे चित्र अतिशय गंभीर अशा प्रकारचं आहे. याची नोंद राज्य आणि केंद्र सरकारला घ्यावीच लागेल.

ज्येष्ठ नेते पवार म्हणाले, लोकसभेचं अधिवेशन काल संपलं. गेले दोन-चार दिवस आम्ही बघतो आहोत, तुमचे (जनतेचे) प्रतिनिधी बजरंग सोनवणे, निलेश लंके असतील आणि जे कोणी खासदार तिथे महाराष्ट्राचे आहेत त्यांनी हा प्रश्न उचलून धरला. गृहमंत्र्यांना भेटले. संसदेत हा प्रश्न मांडून इथे न्याय द्या या प्रकारचा आग्रह बजरंग सोनवणे आणि त्यांच्या सगळ्या

# कर्नाटकातील अपघातात जत तालुक्यातील एकाच कुटुंबातील सहा ठार

सांगली : मोरबगी (ता.जत) येथील एकाच कुटुंबातील सहा जणांचा कर्नाटकात रस्ते अपघातात मृत्यू झाल्याने गावासह तालुक्यात शोककळा पसरली आहे. नाताळ सुट्टीसाठी मोरबगीचे हे कुटुंब मूळगावी परतत असताना मोटारीवर कंटेनर पलटी झाल्याने हा अपघात रात्री घडला.

बंगळूर ते गुंटूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या या भीषण अपघातात मूळचे मोरबगी (ता.जत) येथील रहिवाशी असलेले चंद्रम इराप्पा इगाप्पागोळ यांच्यासह कुटुंबातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतामध्ये त्यांच्यासह पत्नी, एक मुलगा, दोन मुली व भावजय यांचा समावेश आहे. या अपघाताचे वृत्त समजताच मोरबगी गावासह तालुक्यात शोककळा पसरली आहे.

इगाप्पागोळ (वय ४६) हे आपल्या एसयुव्ही (केए ०१ एनडी १५३६) वाहनांने नाताळ सुट्टीसाठी गावी मोरबगी (ता. जत) येथे येत होते. बंगळूर- गुंटूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रक आणि कंटेनर यांचा अपघात झाला. याच दरम्यान, त्यांची मोटार पुढे जाण्याच्या प्रयत्नात असताना कंटेनर त्यांच्या मोटारीवर कोसळला. यामुळे मोटार पूर्णपणे दबली गेल्याने मोटारीत असलेल्या सहा जणापैकी कोणालाही बाहेर पडता आले नाही. ही घटना बंगलोर जिल्ह्यातल नेलमंगळा तालुक्यातील तळकेरे गावाजवळ घडली. अपघातानंतर क्रेनच्या मदतीने कंटेनर बाजूला केल्यानंतर आतील प्रवाशांना बाहेर काढता आले.मृतामध्ये चंद्रम इगाप्पागोळ यांच्यासह पत्नी धीराबाई (४०), मुलगा गण (१६), भावाची पत्नी विजया लक्ष्मी (वय ३५), मुली दीक्षा (१०) आणि आर्या (६) या सहा जणांचा समावेश आहे.

# ऑस्करच्या शर्यतीत 'अनुजा'

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई /प्रतिनिधी**

ऑस्कर २०२५ ची सध्या चांगलीच चर्चा आहे. ऑस्कर २०२५ सोहळा पुढील वर्षी थाटामाटात संपन्न होणार आहे. भारताचे प्रतिनिधित्व करत इथल्या संस्कृतीशी नाळ जोडणाऱ्या 'अनुजा' या भारतीय लघुपटानेही यंदाच्या ऑस्करच्या लघुपट श्रेणीत स्थान मिळवले आहे. 'लाइव्ह-ॲक्शन' शॉर्ट फिल्ममध्ये 'अनुजा' १८० शॉर्ट फिल्मसमधून निवडण्यात आली आहे.

'अनुजा'ची निर्मिती सुचित्रा मटाई यांची असून गुनीत मोंगा या लघुपटाच्या कार्यकारी निर्मात्या आहेत. हा लघुपट वस्त्रोद्योगातील बालमजुरीच्या समस्येवर आधारित आहे. एडम.जे.ग्रेव्स लिखित, दिग्दर्शित या लघुपटामध्ये मराठी अभिनेते नागेश भोसले तसेच सजदा पठाण, अनन्या शानभाग, गुलशन वालिया, सुशील परवाना, सुनीता भादुरीया, जुगल किशोर, पंकज गुप्ता, रोडॉल्फो राजीव हुर्बेट सारख्या कलाकारांनी अभिनय केला आहे.

'अनुजा'ची कथा एका भारतीय मुलीवर आधारित असून इंडो-अमेरिकन प्रोडक्शन अंतर्गत त्याचे चित्रीकरण करण्यात आले आहे. ऑस्करच्या लघुपट श्रेणीत 'अनुजा' लघुपटाला स्थान मिळाल्याबद्दल अभिनेते नागेश भोसले यांनी आनंद व्यक्त केला आहे.

याबद्दल बोलताना नागेश भोसले सांगतात की, 'ऑस्कर सारख्या मानाच्या सोहळ्यात आपला लघुपट असणे ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. बालमजुरीसारखा सामाजिक प्रश्न या लघुपटातून अत्यंत प्रभावीपणे मांडला असून एका उत्तम टीमचा भाग होता आल्याचा आनंद निश्चित आहे'. ९७ व्या ऑस्कर पुरस्कार-२०२५ च्या पुरस्कारासाठीची नामांकने १७ जानेवारीला जाहीर होणार आहेत. ऑस्कर पुरस्कार सोहळा २ मार्च रोजी होणार आहे. यामध्ये विजेते घोषित केले जातील. त्यात 'वस्त्रोद्योगातील बालमजुरीच्या समस्येवर भाष्य करणारा 'अनुजा' लघुपट बाजी मारतो का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# संपादकाला मारहाण करणाऱ्या 'त्या' अभियंत्यावर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल


## पत्रकार संघटनांच्या प्रयत्नांना यश; पोलीस कारवाईला गती

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

उन्नती न्यूजचे संपादक बाजीराव सोनवणे यांना मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जलसंधारण विभागाच्या प्रभारी कार्यकारी अभियंता सुंदर वाघमारे यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १७ डिसेंबर रोजी जलसंधारणाच्या वरिष्ठ कार्यालयाच्या आवाराबाहेर घडली होती.

**प्रकरणाचा तपशील :**

साप्ताहिक उन्नती पत्राच्या अंकात मृद व जलसंधारण विभागाच्या भ्रष्टाचाराबाबत एक बातमी प्रकाशित करण्यात आली होती. यामुळे संतप्त झालेल्या





## भ्रष्टाचाराची बातमी छापल्याकारणाने संपादकाला धमकी आणि मारहाण

पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची, पत्रकार संघटनेची आयुक्तांकडे मागणी

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

जालना जलसंधारण विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता सुंदर वाघमारे यांच्याविरोधात भ्रष्टाचाराची बातमी प्रसिद्ध केल्यामुळे साप्ताहिक उन्नती पत्राचे संपादक बाजीराव भानुदास सोनवणे यांना धमकावल्याचा आणि मारहाण केल्याचा आरोप झाला आहे. संपादकांनी पोलीस आयुक्तांना याबाबत तक्रार देत आरोपीविरोधात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

घटनेचा तपशील असा आहे कि, संपादक बाजीराव सोनवणे यांनी आपल्या साप्ताहिकात सुंदर वाघमारे यांच्या भ्रष्टाचाराविषयीची बातमी छापली होती. दिनांक १७ डिसेंबर रोजी, दुपारी १ वाजता, मृद व जलसंधारण विभागाच्या छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य कार्यालयात सदर वर्तमानपत्र वाटप करत असताना वाघमारे यांनी त्यांना गाठले. कोणतीही चर्चा न करता वाघमारे यांनी त्यांना माझ्या विरोधात बातमी छापलीस आणि पेपर वाटायला आलास? असे म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर तुझे हात-पाय तोडतो, डोळे फोडतो, अशी धमकी देत शारीरिक मारहाण केली, पुढे बातमी छापल्यास जिवे मारण्याची धमकी दिली.

संपादक सोनवणे यांनी या घटनेचा व्हिडिओ चित्रीकरण आणि ऑडिओ रेकॉर्डिंग पोलिसांना सादर केले आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, वाघमारे यांनी आपल्या गैरकारभाराचे पुरावे उघड होऊ नयेत म्हणून ही धमकी दिली आहे. संपादकांनी पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिन आढाव यांनी वाघमारे यांच्या गैरकारभाराविरोधात जलसंधारण कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. सदर घटना उपोषणस्थळी घडल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकारामुळे पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विविध संपादक संघटनांनी घटनेचा तीव्र निषेध केला असून प्रशासनाकडून तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पत्रकारांवरील हल्ल्यांचे वाढते प्रमाण गंभीर बनले असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालणे गरजेचे आहे. पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनावर, रतनकुमार साळवे, रामेश्वर दरेकर, बाजीराव सोनेने, बबन सोनेने, राज ठाकरे, दिनेश परदेशी, प्रवीण बोरुडे, प्रमोदकुमार, शेख शफिक, राहुल वडमारे,अजमत पठाण, फिरोज शेख, काजी नजीमोद्दीन, विलास साळवे, फिरोजखान, अंबादास तळणकर, नितीन दांडगे, सुनील खराबे आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियंता सुंदर वाघमारे यांनी संपादक बाजीराव सोनवणे यांना अश्लील शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी सोनवणे चित्रीकरण करत असल्याचे लक्षात येताच वाघमारे यांनी त्यांच्या मोबाईलवर हात मारून तो फेकून दिला. या हल्ल्यात सोनवणे यांच्या खांद्याला दुखापत झाली असून त्यांच्यावर घाटी रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले.

**विविध संघटनांचा पाठिंबा:** घटनेनंतर एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनसह अनेक पत्रकार संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या घटनेचा निषेध केला. पोलीस आयुक्ताना भेटून निवेदन दिले. सुरुवातीला वेदांतनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. संघटनांच्या मागणीनंतर २० डिसेंबर रोजी भारतीय दंड विधान २०२३ अंतर्गत कलम ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) तसेच पत्रकार संरक्षण कायदा २०१७ अंतर्गत कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

**भ्रष्टाचार व तक्रारींचा डोंगर:** अभियंता सुंदर वाघमारे यांनी १९९० साली जालन्यातील जलसंधारण विभागात शाखा अभियंता म्हणून काम सुरू केले. सध्या भोकरदन येथे उपअभियंता असून जालन्याच्या कार्यकारी अभियंता पदाचा प्रभारी पदभार सांभाळत आहेत. वाघमारे यांच्याविरोधात यापूर्वीही भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या असून विविध संघटनांनी त्यांच्याविरोधात उपोषणही केले आहे. मात्र, आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**निलंबनाची मागणी :** या घटनेमुळे वाघमारे यांची गुन्हेगारी प्रवृत्ती समोर आली आहे. भ्रष्टाचारातून कमावलेल्या संपत्तीमुळे त्यांची हिम्मत वाढल्याचे दिसत आहे. त्यामुळे आरोपी अभियंता वाघमारे यांच्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार आणि सामाजिक संघटनांनी केली आहे.

**सरकारची जबाबदारी :** पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई झाल्याने पत्रकारांमध्ये काहीसा दिलासा मिळाला असला तरी असे प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी कडक पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

## संपादकीय

# संविधान धोक्यात

संविधान धोक्यात आहे, असा प्रचार किंवा अपप्रचार जेव्हा लोकसभा आणि त्यापाठोपाठ विधानसभा निवडणुकीत झाला तेव्हा सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांनी हा 'फेक नरेटिव्ह' सेट केला जात असल्याचा दावा केला. गेल्या तीनसाडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांचे जे हाल निवडणूक आयोगासह राज्य सरकारने केले आहेत, ते संवैधानिक आहेत का? खरे तर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांची निवड पाच वर्षांच्या कालावधीसाठी करण्याची तरतूद आहे. या कालावधीत जनतेच्या अपेक्षांना प्राधान्य देत निर्णय घेण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींवर असते. तथापि, देशात आणीबाणीच्या परिस्थितीत लोकसभेचा कार्यकाळ एका वर्षासाठी वाढवण्याचा अधिकार राज्यघटनेत आहे. परंतु, आणीबाणी संपल्यावर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक आहे. हेच विधानसभेच्या बाबतीतही लागू होते. विधानसभेचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर जर निवडणुका झाल्या नाहीत, तर राज्यात अनुच्छेद ३५६ अंतर्गत राष्ट्रपती राजवट लागू केली जाते. या काळात राज्यपाल, जो राष्ट्रपतींचा प्रतिनिधी असतो, त्याच्या देखरेखीखाली प्रशासकीय कामकाज चालवले जाते. भारतीय संविधानानुसार, लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची निवडणूक प्रक्रिया वेळेवर पार पडणे आवश्यक आहे. परंतु, अलीकडील काळात निवडणुका ज्या प्रकारे लांबणीवर टाकण्यात येत आहेत, ते बघता संविधान धोक्यात आहे, हेच खरे. राज्यातील २३ महापालिका, २५ जिल्हा परिषदा, २८४ पंचायत समित्या, २०७ नगरपालिका तसेच १३ नगर पंचायतींसंदर्भात निवडणूक आयोगाने प्रभागरचना तसेच मतदार यादीची कार्यवाही वाढीव सदस्य संख्येच्या आधारावर पूर्ण केली होती. मात्र, शिंदे सरकार येताच सदस्य संख्येत करण्यात आलेली वाढ आणि निवडणूक आयोगाने केलेली प्रभाग रचना, आरक्षण, तसेच मतदारयादीची कार्यवाही राज्य शासनाने रद्द केली. त्यामुळे निवडणुका प्रलंबित आहेत. प्रलंबनाचा काळ किती असावा? तब्बल साडेतीन वर्षांचा. या निवडणुका राज्यघटनेतील तरतुदीनुसार वेळेच्या आत पूर्ण करणे निवडणूक आयोगाला बंधनकारक आहे, पण आयोगाने त्याच्या कर्तव्यांचे पालन केलेले नाही.

# पुरातत्त्व अधिकारीला सायबर चोरांचा ११.९९ लाखांचा गंडा

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

'आम्ही मुंबई गुन्हे शाखेचे अधिकारी आहोत, तुमचा मनी लाँड्रिंग प्रकरणात सहभाग आहे, तुम्हाला डिजिटल अटक केली आहे', अशी भीती दाखवत सायबर चोरट्यांनी भारतीय पुरातत्त्व विभागाचे सहायक अधीक्षक प्रशांत पंडितराव सोनोने यांना ११.९९ लाख रुपयांनी गंडा घातला आहे. या प्रकरणी बेगमपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

७ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता सोनोने यांना अनोळखी मोबाइल क्रमांकावरून फोन आला. स्वतःला मुंबई गुन्हे शाखेचा अधिकारी म्हणून ओळख करून देत, आरोपीने सोनोने यांना मुंबईत ९ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांच्या एसबीआय क्रेडिट कार्डवरून १.६८ लाख रुपयांचे संशयास्पद ट्रान्झेक्शन झाल्याचे सांगितले. सोनोने यांनी हा व्यवहार नाकारला असता, आरोपीने त्यांच्या आधार कार्डचा गैरवापर कॅनरा बँकेच्या फसवणूक प्रकरणात झाल्याचे सांगून त्यांना डिजिटल अटक झाल्याचे खोटे भासवले. फिर्यादीच्या भीतीचा फायदा घेत, आरोपीने

पान ३ वर

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे !!

**राष्ट्रीय** शेतकरी दिवस हा हिंदीमध्ये 'किसान दिवस' म्हणूनही ओळखला जातो. हा दिवस भारताचे पाचवे पंतप्रधान श्री चौधरी चरणसिंग यांच्या जयंती स्मरणार्थ देखील साजरा केला जातो. 'शेतकरी दिन' हा शेतकरी आणि शेती यांच्या राष्ट्रीय योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी विविध देशांमध्ये वार्षिक साजरा केला जातो. हे जगभरात वेगवेगळ्या तारखांना पाळले जाते. पहिला शेतकरी दिन २००१ मध्ये साजरा करण्यात आला. त्यावेळी दहाव्या सरकारने चौधरी चरणसिंग यांचे कृषी क्षेत्रातील योगदान आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांची जयंती 'किसान दिवस' म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून भारतातील दरवर्षी २३ डिसेंबर रोजी हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रम, वादविवाद, परिसंवाद, प्रश्नमंजुषा स्पर्धा, चर्चा, कार्यशाळा, प्रदर्शने, निबंध लेखन स्पर्धा आणि कार्ये आयोजित करून तो साजरा केला जातो.

चरणसिंह यांचा जन्म १९०२ मध्ये उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील नूरपूर येथे एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आग्रा विद्यापीठातून १९२३ मध्ये विज्ञान विषयात पदवी आणि १९२५ मध्ये पदव्युत्तर पदवी मिळवली. कायद्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गाझियाबादमध्ये कायद्याचा सराव सुरू केला आणि १९२९ मध्ये ते मेरठला गेले. ते पहिल्यांदा १९३७ मध्ये छपरौली येथून यूपी विधानसभेवर निवडून आले आणि १९४६, १९५२, १९६२ आणि १९६७ मध्ये त्यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. १९४६ मध्ये पंडित गोविंद बल्लभ पंत यांच्या सरकारमध्ये ते संसदीय सचिव झाले आणि महसूल, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, न्याय, माहिती इत्यादी विविध खात्यांमध्ये त्यांनी काम केले. जून १९५१ मध्ये त्यांची राज्यात कॅबिनेट मंत्री म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांच्याकडे न्याय आणि माहिती खात्यांचा कार्यभार देण्यात आला. पुढे त्यांनी १९५२ मध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या मंत्रिमंडळात महसूल आणि कृषी मंत्रीपद भूषवले. एप्रिल १९५९ मध्ये त्यांनी राजीनामा दिला तेव्हा ते महसूल आणि परिवहन खात्याची जबाबदारी सांभाळत होते. १९६० मध्ये श्री सी.बी. गुप्ता यांच्या मंत्रालयात ते गृह आणि कृषी मंत्री होते. १९६२-६३ मध्ये चरणसिंग यांनी श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या मंत्रालयात कृषी आणि वनमंत्री म्हणून काम केले. त्या दशकात पंजाब आणि हरियाणामध्ये विकसित झालेल्या हरितक्रांतीने देशाचे कृषी चित्र बदलले. यामुळे उत्पादकता वाढली आणि त्यामुळे भारत विविध कृषी मालामध्ये स्वयंपूर्ण झाला.१९६५ मध्ये त्यांनी कृषी विभाग सोडला आणि १९६६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा पदभार स्वीकारला. चौधरी चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं. यादरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाची कामं केली. त्यांच्यामुळेच आज शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यांनी जमीनदारी रद्द केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लेखापद पद बनवलं. त्यानंतर ते उपपंतप्रधान बनले आणि मग २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८० पर्यंत त्यांनी अत्यंत अल्प कालावधीसाठी पंतप्रधानपदी विराजमान होऊन पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली.



**प्रविण बागडे**
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagde@gmail.com

चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशमध्ये विविध पदांवर काम केले आणि प्रशासनातील अकार्यक्षमता, घराणेशाही आणि भ्रष्टाचार सहन न करणारे कठोर कार्यकारी म्हणून नाव कमावले. एक हुशार संसदपटू आणि व्यावहारिक माणूस चरणसिंग हे त्यांच्या वक्तृत्व आणि विश्वासासाठी ओळखले जातात. ते उत्तर प्रदेशातील जमीन सुधारणांचे मुख्य शिल्पकार होते; ग्रामीण कर्जदारांना मोठा दिलासा देणारे विभाग विमोचन विधेयक १९३९ तयार करण्यात आणि अंतिम करण्यात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जमीनधारणा कायदा १९६० आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उद्देश जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे आणि राज्यभर एकसमान करणे हे होते. एक समर्पित सार्वजनिक कार्यकर्ते आणि सामाजिक न्यायावर दृढ विश्वास ठेवणारे चरणसिंग यांचे सामर्थ्य मुळात लाखो शेतकऱ्यांच्या विश्वासातून निर्माण झाले. भारत हा मुख्यत: खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांमध्ये राहणारी बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहे आणि शेती हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. अजूनही ७०% भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे.

चौधरी चरणसिंह यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध धोरणांनी भारतातील सर्व शेतकऱ्यांना जमीनदार आणि धनदांडग्यांच्या विरोधात एकत्र केले. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या 'जय जवान जय किसान' या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले.

ते एक अतिशय यशस्वी लेखक होते आणि त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली ज्यात शेतकरी आणि त्यांच्या समस्यांबद्दल त्यांचे विचार मांडले गेले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी विविध उपायांच्या स्वरूपात खूप प्रयत्न केले. त्यांनी साधे जीवन व्यतीत केले आणि आपला मोकळा वेळ वाचन आणि लेखनात घालवला. त्यांनी 'जमीनदारीचे निर्मूलन', 'सहकारी शेतीचा क्ष-किरण', 'भारताची गरिबी आणि त्याचे निराकरण', 'शेतकऱ्यांची मालकी किंवा मजुरांसाठी जमीन' आणि 'खालील जमीन ताब्यात घेणे' यासह 'एक निश्चित किमान खाली विभाजनास प्रतिबंध' असे अनेक पुस्तके लिहिल्या.

शेतकरी हा भारताचा कणा आहे. चौधरी चरणसिंग अत्यंत साध्या मनाचे व अत्यंत साधे जीवन जगणारे शेतकरी नेते होते, ज्यांनी भारतीय शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक धोरणे आणली. ते शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यामुळे भारताचे पंतप्रधान असूनही त्यांनी अतिशय साधे जीवन जगले. आपल्या जीवनातील शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याची कबुली देण्यासाठी 'राष्ट्रीय शेतकरी दिन' साजरा केला जातो. सर्वांना शेतकरी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# बनावट औषधांमुळे उपचार बेभरोसे

प्रसाद ग्रहण करत असताना अगदी भक्तीभावाने घेतला जातो. तसेच डोळे बंद करून विश्वासाने गोळ्या औषधेही खाण्यात येतात. प्रसादावर जेवढा विश्वास ठेवण्यात येतो, तेवढाच विश्वास डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्यांवर ठेवला जातो; परंतु जर गोळ्या-औषधच बनावट असतील, तर किंवा त्यामुळेच जीवाला धोका आहे, असे समजल्यावर त्या माणसांची काय अवस्था होईल? याचा नुसता विचार जरी केला तरी जिवाचा थरकाप उडतो. मराठवाड्यातील बीड, नांदेड, धाराशिव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे उघडकीस आले आहे. मराठवाड्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधी व गोळ्यांचा पुरवठा करून रुग्णांसाठी त्याचा वापरही झाल्याचे उघडकीस आले आहे.

नांदेडच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातून मे २०२३ मध्ये न्यूक्लास ६२५ या गोळ्यांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्या गोळ्यांचा अहवाल ऑक्टोबर २०२४ मध्ये प्राप्त झाला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने १ लाख २३ हजार गोळ्यांचा साठा जप्त केला. दीड महिन्यापेक्षा अधिकचा काळ उलटूनही संबंधित कंपनीविरुद्ध कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. विशेष म्हणजे ज्या कंपनीने हा पुरवठा केला होता ती कंपनीच मुळात अस्तित्वात नाही, असे सुरुवातीच्या तपासात आढळून आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुरवठादार व जिल्हा शासकीय रुग्णालयाची यामध्ये मिलीभगत असल्याचे बोलले जात आहे. धाराशिव जिल्ह्यातही औषध निर्मात्या कंपन्यांकडून आवश्यक गुणवत्ता नसणाऱ्या सहा प्रकारच्या गोळ्यांचा पुरवठा करण्यात आला होता. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार तीन टप्प्यात जवळपास पावणेतीन लाख गोळ्या त्या कंपनीने परत बोलावून घेतल्या. औषध पुरवठा करणाऱ्या त्या एजन्सीला धाराशिवमध्ये काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत. धाराशिव जिल्ह्यात आलेल्या सिप्रो-२५० एमजीच्या १ लाख ९ हजार २४०, सेफिक्सिम १ लाख १ हजार ३६२, सिप्रोफ्लोक्सासिन-५०० च्या ४० हजार २५८, एजिथ्रोमाइसिन १० हजार ८६४, अमॉक्सिसिलिन-३७५ च्या १९ हजार ६३०, अमॉक्सिसिलिन-६२५ च्या ७ हजार २४० अशा एकूण २ लाख ८८ हजारांहून अधिक गोळ्यांमध्ये आवश्यक गुणवत्ता नसल्याने संबंधित कंपनीला परत केल्या आहेत. यापैकी काही गोळ्या संबंधित कंपन्यांनी बदलून दिल्याचे समजते.

छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयातही २३ प्रकारच्या औषधी संशयाच्या भोवऱ्यात आहेत. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या आदेशानुसार त्या ३३ प्रकारच्या औषधींचा वापर थांबविण्यात आला. शिवाय यातील २६ प्रकारची औषधी संपलेली असल्याने ज्या औषधींचा वापर थांबविला आहे. त्याऐवजी पर्यायी औषधी रुग्णांना दिली जात असल्याचे घाटी येथील अधिष्ठाता यांनी सांगितले. मराठवाड्यातील बीड जिल्हा तसा नेहमीच चर्चेत असतो. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयास बनावट औषधांचा पुरवठा करणारी एक टोळी उघडकीस आली आहे. मराठवाड्यात सर्वप्रथम या ठिकाणी बनावट गोळ्यांच्या पुरवठा झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणात असलेल्या टोळ्याच समोर आल्या आहेत. अंबाजोगाई येथील रुग्णालयात ॲझिमॅसीन-५०० या औषधांचे सॅम्पल नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. त्यांची तपासणी होऊन २३ ऑक्टोबर २०२४ रोजी आलेल्या अहवालात सदरील औषध हे रुग्णांसाठी निष्क्रिय व बनावट असल्याचे उघडकीस आले. या गोळ्यांमध्ये ॲजिथ्रोमायसीन हा घटक असणे अत्यंत आवश्यक होते; परंतु सदरील गोळ्यांमध्ये ॲजिथ्रोमायसीन नसल्यामुळे हा बनावट गोळ्यांचा प्रकार उघडकीस आला. किमान साडेआठ हजार रुग्णांच्या पोटात या गोळ्या गेल्या. यामधून जीवित हानी झाली नाही, असे सांगितले जात असले तरी या प्रकरणाच्या खोलाशी गेल्यास यामधून काहीतरी वेगळेच बाहेर येईल, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. याप्रकरणी सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी जि. ठाणे), द्विती सुमित त्रिवेदी, (सुरत) व विजय शैलेंद्र चौधरी रा. मीरा रोड, ठाणे या चौघा जणांविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्या औषधीच्या तक्रारीनंतर सव्वा वर्षाने अहवाल प्राप्त झाला व त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. म्हणजेच या दरम्यान हजारो रुग्णांच्या पोटात त्या गोळ्या गेल्या. त्या बनावट गोळ्या रुग्णांसाठी किती घातक ठरल्या हे आता शोधण्याची गरज आहे.

मराठवाड्यात ज्या औषधी कंपनीने गोळ्या पुरवठा केल्यात त्यापैकी उत्तराखंडमधील ब्रिस्टल फार्मा, केरळमधील रिफंड फार्मा, बायोटेक फॉर्म्युलेशन व मेलबर्न बायो सायन्स तसेच एस एम एन लॅब या पाच कंपन्या बनावट असल्याचे समोर आले आहे. या कंपन्यांनी प्रत्येक ठिकाणी बनावट औषधांचा पुरवठा केला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या कंपन्यांची औषधे असल्यास त्याबाबत त्वरित कळविण्यात यावे, असे पत्र संचालक कार्यालयातर्फे मराठवाड्यातील जिल्हा रुग्णालयांना पाठविण्यात आले आहेत. पूर्वी एक म्हण खूप प्रसिद्ध होती. शहाण्या माणसाने कोर्टाची व पोलीस स्थानकाची पायरी चढू नये, असे म्हटले जायचे; परंतु आता त्यामध्ये आणखी एक भर पडली आहे. शहाण्याला कधीही दवाखान्यात जाण्याची वेळ येऊ नये, असेच मराठवाड्यातील अनेक प्रकरणांवरून म्हणता येईल. आरोग्य यंत्रणेतील पुरवठादार तसेच ठेकेदार यंत्रणा रुग्णांच्या जीवावर उठली आहे. बनावट औषधांचा पुरवठा करून या लोकांनी काय साध्य केले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अन्न व औषधी प्रशासनाचा कारभारही रुग्णांसाठी जीवघेणाच ठरत आहे. तपासणीसाठी पाठविलेल्या गोळ्यांबाबतचा अहवाल सव्वा वर्षाने प्राप्त झाला आणि त्यानंतर गुन्ह्याची नोंद होते, म्हणजे आरोग्य यंत्रणा तसेच अन्न व औषध प्रशासन हे दोघेही चक्क झोपेत आहेत की काय? असेच म्हणण्याची वेळ अंबाजोगाई येथील बनावट गोळ्या प्रकरणानंतर सर्वांच्या लक्षात येत आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात औषधी गोळ्यांचा वेगळाच काळाबाजार चालतो. या ठिकाणी दाखल असलेल्या रुग्णाला अनेकदा बाहेरून औषध-गोळ्या विकत आणाव्या लागतात. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, धाराशिव, जालना, परभणी, हिंगोली यासह लातूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात सर्वत्र अलबेल कारभार आहे.

रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, औषधोपचार व कर्मचारी व डॉक्टरांची वागणूक यावरून अनेकदा बाचाबाची होते, तसेच त्याचे पर्यवसान भांडणात झाल्याचे पाहावयास मिळते.

पान ३ वर

# शंभर कोटी मुले हवामानबदलाच्या विळख्यात

**जगभरातील** शंभर कोटींहून अधिक, विशेषत: भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक आणि नायजेरिया अशा कमी विकसित देशांमध्ये राहणाऱ्या मुलांना हवामानबदलामुळे वाढत्या धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यांना आधीच स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. त्याबरोबर आता या धोक्याचा सामना करावा लागत आहे.

'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' (युनिसेफ)ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यात येत्या काही वर्षांमध्ये मुलांच्या दृष्टीने पर्यावरणाच्या वाढत्या धोक्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. या अहवालानुसार, येत्या काही दशकांमध्ये म्हणजे २०५० पर्यंत मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागणार आहे. अहवालानुसार २०५० च्या पिढीला आताच्या तुलनेत जास्त उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. अभ्यासानुसार, २०५० पर्यंत जगातील तापमान आताच्या जवळपास आठपट वाढू शकते. याचा अर्थ असा आहे की, मुलांना अधिक तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल. 'युनिसेफ'च्या अहवालानुसार येत्या काही वर्षांमध्ये उष्णतेमुळे जंगलात आग लागण्याचा धोका वाढणार आहे. वातावरणातील बदलामुळे, वाढलेली उष्णता-पूर-दुष्काळ यामुळे मुलांच्या भवितव्यासाठी मोठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, हवामानबदलाच्या धोक्याचा सामना करणाऱ्या या मुलांसाठी तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे.

जगातील कोट्यवधी मुले सध्या मोठ्या धोक्याच्या छायेखाली आहेत. हवामानबदलामुळे मोठा विद्ध्वंस होऊ शकतो. जगातील ३३ देशांमध्ये येणारा काळ मुलांसाठी सर्वात धोकादायक असू शकतो. हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांचा या देशांवर सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. आश्चर्याची बाब म्हणजे जगातील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात यादीत समाविष्ट असलेल्या या देशांचे योगदान फारच कमी आहे. यादीत समाविष्ट असलेले हे ३३ देश, ज्यात भारताचाही समावेश आहे, एकत्रितपणे केवळ नऊ टक्के वायू उत्सर्जित करत आहेत. असे असूनही, या देशांमधील मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींसारख्या वातावरणातील बदलांमुळे सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्येमध्ये सर्वात जास्त सहभाग असलेले देश सुमारे ७० टक्के वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. यापैकी फक्त एका देशाला मुलांसाठी सर्वाधिक धोका असलेल्या देशांमध्ये स्थान देण्यात आले आहे.

'चिल्ड्रेन क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार, मध्य आफ्रिकन रिपब्लिकला ८.७ गुणांसह मुलांसाठी हवामानबदलाचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून स्थान देण्यात आले आहे. यानंतर नायजेरिया आणि चाड ८.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. भारत ७.४ गुणांसह २६ व्या स्थानी आहे. पाकिस्तान (७.७ गुण) आणि अफगाणिस्तान, बांगलादेश, इथियोपिया ७.६ गुणांसह चौदाव्या आणि पंधराव्या स्थानी आहेत. लिंचेस्टीन हा युरोपियन देश २.२ गुणांसह मुलांसाठी हवामान बदलापासून सर्वात सुरक्षित देश मानला गेला असून या यादीत शेवटच्या म्हणजेच १५३ व्या क्रमांकावर आहे. युनिसेफ ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जी मुले आणि मातांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहे. हा संयुक्त राष्ट्रांचा एक भाग आहे. १९४६ मध्ये विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातील मुलांना, भेडसावणाऱ्या समस्या लक्षात घेऊन त्याची स्थापना करण्यात आली. जगातील मुलांचे जीवनमान सुधारणे हे 'युनिसेफ'चे उद्दिष्ट आहे.

'युनिसेफ' मुलांसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, शुद्ध पाणी, पोषण आणि शिक्षण यांसारख्या आवश्यक मूलभूत सेवा पुरवते. याव्यतिरिक्त ती हिंसा, शोषण आणि भेदभाव दूर करण्यासाठी कार्य करते. गरिबी, युद्ध किंवा इतर आपत्कालीन परिस्थितींचा मुलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या देशांमध्ये ही संस्था विशेष सक्रिय आहे. जगातील सर्वात लहान बेट राष्ट्र असलेल्या नाउरूमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन अत्यंत कमी आहे. आकाराने खूप लहान असलेल्या या देशाची लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचे एकूण उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालू या देशात हरितगृह वायू उत्सर्जन खूप कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा लहान आकार आणि मर्यादित औद्योगिकीकरण. भूतानमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन खूपच कमी आहे. याचे कारण तेथे अधिक जंगले आणि वनक्षेत्रे आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. माली हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय कमी औद्योगीकीकरण असलेला देश. तिथे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. वातावरणातील बदलामुळे मुलांना पूर, उष्णतेची लाट, दुष्काळ अशा आपत्तींचा धोका तर वाढतोच; पण त्यांच्या आहारातील पोषक घटकही कमी होत आहेत. 'द स्टेट ऑफ द वर्ल्डस चिल्ड्रन' या अहवालानुसार हवामान-संबंधित आपत्ती, लोकसंख्येतील बदल आणि तंत्रज्ञानाच्या प्रवेशातील असमानता ही आजची मोठी आव्हाने आहेत.


२०२३ हे हवामान इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. यंदा जागतिक तापमानातील वाढ दीड अंश सेल्सिअसची लक्ष्मणरेषा ओलांडण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये हवामानाच्या वाढत्या धोक्यांचा परिणाम लहान मुलांवर अधिक गंभीरपणे होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली. पूर्व आणि दक्षिण आशिया तसेच पॅसिफिक, मध्य पूर्व, उत्तर, पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील देशांमध्ये अतिउष्णतेचा सामना करणाऱ्या मुलांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ होऊ शकते, असे अहवालात म्हटले आहे. पुरामुळे पूर्व आफ्रिका आणि पॅसिफिक प्रदेशातील मुलांना सर्वात जास्त फटका बसण्याची शक्यता आहे. या संदर्भात 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल यांनी म्हटले आहे की, मुलांना हवामान आपत्तींपासून ऑनलाइन धोक्यांपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे धोके काळाच्या ओघात अधिक गंभीर होतील. २०५० मध्ये चांगले भविष्य घडवण्यासाठी कल्पनेपेक्षा जास्त प्रयत्न करावे लागतील. या अहवालात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या नाट्यमय बदलांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. यानुसार पुढील २६ वर्षांमध्ये उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियामध्ये मुलांची लोकसंख्या सर्वाधिक असेल; आफ्रिकेत मुलांची संख्या सर्वाधिक असूनही ही लोकसंख्या ४० टक्क्यांच्या खाली पोहोचू शकते. २०००च्या दशकात लोकसंख्येतील हा हिस्सा सुमारे ५० टक्के होता. त्याचप्रमाणे, पूर्व आशियामध्ये २००० मध्ये असणारा २९ टक्के वाटा आता १७ टक्क्यांच्या खाली जाईल. पश्चिम युरोपमध्येही असेच काहीसे चित्र पाहायला मिळेल. या बदलांमुळे जगासमोर नवी आव्हानेही निर्माण होतील.

**- मिलिंद बेंडाळे**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं. ए-३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को.-ऑप. सोसायटी लि.,एमआयडीसी रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)-४३१००१ येथे छापून एफ-४/१४, अयोध्यानगर, एन-७, सिडको, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)-४३१००१ येथे प्रसिद्ध केले.
• संपादक - **रतन नामदेव साळवे** • मो. **9923502320** • Email : **nilepratik02@gmail.com.**

# देवकीनंदन गोपाला!

बाबा,
तुझं खानदान धोब्याचं.
धोब्यानं भल्या घरची धुणी धुवावी,
चार घरच्या भाकऱ्या गोळा कराव्या,
ढेबूजी जानोरकर वट्टी म्हणून नाव कमवावं,
बायकापोरांचं पोट भरावं.....
आणि खाऊन पिऊन सुखी रहावं!
पण तुला काय अवदसा आठवली कोण जाणे?
अंगावर रंगीबेरंगी चिंध्या अंथरल्यास,
धोतर सोडून जुनेर नेसलास,
एका कानात कवडी,
दुसऱ्या कानात बांगडी,
डोक्यावर खापराचा तुकडा ठेवून,
हातात काठी घेऊन,
नांदत्या घरातून बाहेर पडलास आणि.....,
नकळत मला सर्वस्वाचे त्याग करणाऱ्या बुध्दांची
आठवण देऊन गेलास!
म्हातारी आई,
तीन महिन्याची गर्भार बायको,
दोन चिमुरड्या लेकी.
काही, काही पाहिलं नाहीस तू.
एका क्षणात या साऱ्यांकडे पाठ फिरवलीस.
एक मुक्तात्मा पिंजरा तोडून मुक्त संचारासाठी
निघाला.
लोकांच्या लाथा खाऊन त्यांना बाता शिकवणारा
एकमेव अवलीया तू.
गंगा बहती भले,
साधू चलते भला,
अगदी तसाच तू चालत राहिलास,
वाऱ्यासारखा रात्रंदिवस वाहत राहिलास.
टक्के टोणपे खात राहिलास.
भजन किर्तन गात राहिलास.
हातात खराटा घेऊन अक्षरशः पन्नास वर्षे इथले रस्ते



झाडत राहिलास
आणि......
शुभ्र पंचा
नेसणाऱ्या
महात्म्यांनाही
हातात झाडू
धरायला
लावलास.
नाहीतरी
जातीवंत धोबीच
होतास ना तू.
सकाळी
गावातली
घाण साफ करुन संध्याकाळी डोक्यातली घाण साफ केलिस अन् भविष्यातल्या कित्येक शाम मानवांना प्रेरणा देऊन गेलास. आयुष्यभर भाकरीचा शिळा तुकडा खाऊन खापरामध्ये पाणी प्यायलास, लुळ्या पांगळ्यांना कडेवर घेतलेस, महारोग्यांना स्वतःच्या हाताने चांगलं चोळून, मोळून न्हाऊ माखू घातलेस अन् कित्येक बाबा आमट्यांना जगण्याचा उद्देश प्राप्त करुन दिलास.
कुठलाही चमत्कार न करता स्वतःच एक चालता बोलता चमत्कार झालास. तुझं कीर्तन ऐकून आचार्य अत्रेसारख्या शब्दप्रभूंनी सुध्दा तोंडात बोट घालावे, प्रबोधनकारासारख्या तर्कतीर्थाने सुध्दा तुझ्यासमोर नतमस्तक व्हावे, धर्मांतराच्या बाबतीत संविधानकाराने सुध्दा तुझा शब्द प्रमाण मानावा? खरच इतका का तू महान होतास? खरच बाबा, आज तू हवा होतास. ताडकन उठला असतास आणि अयोध्येला जाऊन कारसेवकांपुढे भजनाचा गजर सुरु केला असतास. प्रश्नांची झड सुरु झाली असती. कारसेवा झाली का? झाली बाबा. मंदिरातले राम दिसला आणि रस्त्यावरचा दिसला का? नाही बाबा. अरे, असे कसे आंधळे झाले तुमी? एवढ्या लांबून तुमी रामाचे मंदिर बांधायले एयर कंडिशन रथयात्रा घेऊन आले आणि तुम्हाले तुमचे दारात उभे राहिलेले राम दिसले नही?
दारात उभे राहिलेले राम ठनाना करते. खपाटी गेलेले पोट, हातापायाच्या काड्या, त्येला भूक लागलेलेली असते. ते भाकरीसाठी गयावया करते. त्याले हाकलून देता आणि खुशाल येथे रामाचे मंदिर बांधायले येता. भल्ले लब्बाड गडी तुम्ही. राममंदिर इथे नाही बाप्पा. ते तर नवकोटी दीन दलित जनतेच्या हृदयात आहे. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जे आपुले. तुका म्हणे सांगू किती, तेची भगवंताची मुर्ती! भुकेल्याले अन्न द्या, तान्हेल्याले पाणी द्या. यापरते दुसरे पुन्य नही. उपास तापास कराल, पुन्य नही. तासंतास देवाची पुजा कराल, पुन्य नही. कारसेवा कराल, पुन्य नही. बाबरी मशीद तोडाल, पुन्य नही. राम मंदिर बांधाल, पुन्य नही. तुका म्हणे जन्म गेला, शिला वाहता, वाहता मेला. असं म्हणून तू जोरजोरात टाळ्या वाजविल्या असत्यास,
बेभान होऊन नाचला असतास,
आणि मग तू तुझ्या आवडीचं
भजन बोलला असतास.........,
गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला!

**– विवेक मोरे**

गाडगे बाबांच्या क्रांतिकारक स्मृतीस विनम्र अभिवादन!

# युवा महोत्सवासाठी २९५ संघाची नोंदणी

- **दोन हजार कलावंत सहभागी होणार**
- **सहभागी न होणाऱ्या १८१ महाविद्यालयांना १० हजारांचा दंड भरावा लागणार**

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा केंद्रीय युवक महोत्सव येत्या २५ ते २८ डिसेंबर दरम्यान होत असून एकुण २९५ महाविद्यालयांनी नोंदणी केली आहे. महोत्सवात सुमारे दोन हजार कलावंत सहभागी होणार आहेत.

युवक महोत्सवाच्या तयारीसाठी मा. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली सल्लागार समिती व संयोजन समिती स्थापन करण्यात आली आहे. यंदाचा महोत्सव देखील विद्यापीठाच्या मुख्य परिसरात होणार आहे. गेल्या वर्षाभरात इंद्रधनुष्य महोत्सव, 'नॅक', दीक्षांत समारंभ आदी मा. कुलगुरु डॉ.विजय फ्फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. यंदा संपूर्ण नोंदणी प्रक्रिया ही ऑनलाईन ठेवण्यात आली. ७ ते १८ डिसेंबर या काळात महाविद्यालयांनी नोंदणी करुन हार्ड कॉपी विद्यार्थी कल्याण विभागात जमा केली. गेल्या १२ दिवसात ४७६ पैकी २९५ म हाविद्यालयीन नोंदणी केली आहे. महोत्सवात २९५ महाविद्यालयांचे एकुण १ हजार ८८० कलावंत सहभागी होणार आहेत. यामध्ये १ हजार १३ विद्यार्थी तर ८६७ मुलींचा सहभाग आहे. तसेच २६८ पुरुष व १६८ महिला असे ४३६ संघ व्यवस्थापक आसणार आहेत. तर महोत्सवात सहभागी न होणा-या ८१ महाविद्यालयांना प्रत्येक १० हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. या संदर्भात कसलीही गय करण्यात येणार नाही, अशा सूचना मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी दिल्या आहेत.

**सल्लागार संयोजन समिती बैठक**

महोत्सवाच्या तयारीसाठी एकुण २५ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. जवळपास १२५ प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी या समित्यामध्ये असणार आहेत. सल्लागार समितीची शुक्रवारी (दि. २० ) दुपारी मा. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. कुलसचिव डॉ प्रशांत अमृतकर यांच्यासह सदस्य यावेळी उपस्थित होते तर विविध समित्यांची बैठक शनिवारी (दि.२१ ) घेण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी दिली.

**प्रकुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली समिती नेमणार**

गेल्या १० ते १२ वर्षांपासून जे महाविद्यालय युवक महोत्सवात सहभागी घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांची सत्यता पडताळणी करण्यासाठी तसेच कारण मीमांसा करण्यासाठी प्रकुलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापना करण्यात येणार आहे.

# स्मृतिशेष दादा अंबादे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त परिसंवादाचे यशस्वी आयोजन

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**नागपूर/प्रतिनिधी**



समता सैनिक दल नागपूर मुख्यालयाच्या वतीने स्मृतिशेष दादा अंबादे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त १९ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७:०० वाजता मंगलमंडप येथे परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. आंबेडकरी चळवळीतील प्रख्यात विचारवंत व साहित्यिक विनायकरावजी जामगडे, प्रा. देवीदास घोडेस्वार, छायाताई खोब्रागडे, व भंते गौतमपाल यांच्या उपस्थितीत हा परिसंवाद संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक त्रिशरण व पंचशील प्रार्थनेने करण्यात आली. समता सैनिक दलाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जयभीम सलामी अर्पण करण्यात आली. प्रास्ताविकात सचिन कांबळे यांनी दादा अंबादे यांच्या जीवनप्रवासावर व दलातील त्यांच्या अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला.

परिसंवादात गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा सर्व वक्त्यांनी तीव्र निषेध केला. यासोबतच परभणीतील घटनेवरही खेद व्यक्त करण्यात आला. छायाताई खोब्रागडे यांनी समता सैनिक दलाची महत्त्वपूर्ण भूमिका विशद करत बाबासाहेबांच्या स्वप्नातील शिस्तबद्ध समाज निर्माण करण्याचे आवाहन केले. प्रा. देवीदास घोडेस्वार यांनी संविधानातील नैतिक मूल्ये व लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी मनुवादी विचारसरणीविरुद्ध एकजुटीने प्रतिकार करण्याची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात विनायकरावजी जामगडे यांनी समता सैनिक दलाच्या ऐतिहासिक योगदानाचा उल्लेख करत, सध्याच्या आणि आगामी सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी दलाने समता आणि एकता टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

परिसंवादात समता सैनिक दलाच्या वर्धा व उमरेड शाखेच्या सैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दादा अंबादे यांच्या कुटुंबातील नलिनी ताईंनी या कार्यक्रमाच्या आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रमाचे संचालन सचिन टेंभूरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शैलेश बागडे यांनी केले. या परिसंवादाच्या आयोजनात मा. एन. टी. मेश्राम, चंदू वाघमारे, नंदू वाघमारे, पंकज डोंगरे, रामा डहरिया, बॉबी गजभिये, विकास जांभुळकर, प्रदीप वर्मा, उज्वल बागडे, तनु मेश्राम आदींचा म ोलाचा सहभाग होता.

# खरा देव माणुसकीतच – गाडगेबाबा; अभिवादन सभेत प्रा. दाभाडे यांचे प्रतिपादन

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

आज साकेत विहारात भिमाई रामजीआंबेडकर यांचा १२८वा स्म्रुतीदिन तसेच संत गाडगेबाबा यांची ६८ वी पुण्यतिथी निमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती.संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा व समाजसेवेचा आढावा प्रा. सुनिल दाभाडे यांनी घेताना गाडगेबाबा त्यांच्या ग्राम स्वच्छतामधुन अंधश्रद्धा निर्मूलन मुक्त समाज करित आपल्या दशसुत्री संदेश किर्तनद्धारे देत दिन दुबळयाची त्यांनी हयातभर सेवा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्याचे ते पुरस्कर्ते होते वंचित समुहाच्या शिक्षणासाठी पंढरपूरची धर्म शाळा त्यांनी बाबासाहेबांना दान केली. बाबासाहेब यांचे निधनाने ते अतिव दु:ख्खी झाले व अन्न पाणी त्याग करुन अवघ्या १४ दिवसानी त्यांनी देह त्याग केला. त्यांचे जीवनावर डेबू, देवकिनंदन गोपाला हे चित्रपट तर संत गाडगेबाबा स्वच्छ ता अभियान राबवत अनेक पुरस्कार देत शासनाने कार्याची दखल घेतली.या समयी महामानव डॉबाबासाहेब आंबेडकर यांच्या माता भिमाई यांच्या जीवनावर भास्कर म्हस्के यांनी भाष्य केले या दोन महानविभुतीच्या स्मुती ला सर्वानी अभिवादन केले.




सदर अभिवादन सभेला दिनकरराव जाधव कमलाकर साळवे, टी एन थोरात यांनी संत गाडगेबाबा यांना व सीमा भोसले ताई यांनी माता भिमाई यांना पुष्पहार अर्पण केले. साकेत बुद्धविहार समितीचे संघदीप रोडगे, सुभाष साबळे, धनराज गोंडाने, रमेश जाधव, भिमराव मस्के, भानुदास गायकवाड रामप्रसाद डोंगरे, धर्म राज नगराळे, संजय वानखेडे, लोणारे, धनराज शिंदे तर उपासिका संघाच्या महिला व साकेतनगरमधील उपासक उपस्थित होते. सुरवातीला आदर्शंना धुपदिप व पुष्प हाराने वंदन त्रिसरण पंचशील घेऊन व शेवटी धम्म पालन गाथेने कार्यक्रम संपन्न झाला.

# न्यायाच्या प्रतीक्षेत आंबेडकरी आंदोलक

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**परभणी/प्रतिनिधी**

१० डिसेंबरला परभणीत भारताचे संविधान या शिल्प वितंबने नंतर आंबेडकरी जनतेने पुकारलेल्या आंदोलनातून प्रतिक्रिया देऊन घटनेच्या गंभिर्याला वाचा फोडली. त्या नंतर सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीत झालेल्या मृत्यूने सबंध महाराष्ट्रात तालुक्यापासून ते राज्याच्या राजधानी पर्यंत आंबेडकरी पक्ष संघटनांच्या आंदोलनातून पडसात उमटले.

सोमनाथ सुर्यवंशी या विधीशास्त्र विद्यार्थ्यावर अंतिम संस्कार विधी होत असतांनाच परभणी प्रकरणावर आंदोलनाचे नेतृत्व करणारे पँथर विजय वाकोडे यांचे ही हृदयविकाराने निधन झाले.

हे परभणी प्रकरण विधिमंडळातही आ. नितीन राऊत, आ. जितेंद्र आव्हाड, नाना पटोले यांच्यासह आमदारांनी उचलून धरल्याने सरकारला स्पष्टीकरण द्यायला भाग पाडले.

परंतु विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले स्पष्टीकरण कुणाच्याच पचनी पाडणारे नव्हते. यामुळे आंबेडकरी जनतेत तीव्र असंतोष पसरला आहे. त्यामुळे जो पर्यंत न्याय मिळणार नाही तो पर्यंत हे परभणीतील साखळी धरणे आंदोलन सूरूच ठेवायचा निर्धार केला आहे.

पान २ वरून

# बनावट औषधांमुळे उपचार बेभरोसे

रुग्णांचे वागणे प्रशासनाला कदाचित वाईट वाटणारे असेल; परंतु त्याच रुग्णांना दिले जाणारे बनावट औषध जीवघेणे ठरत आहेत. अशा परिस्थितीत दोष रुग्णांचा की आर्थिक फ्फायद्यासाठी बनावट औषधी विक्रेते करणाऱ्या कंपन्यांचा व प्रशासनाचा? हा विचार कुठेतरी गांभीर्याने होणे गरजेचे आहे. मराठवाड्यात बोगस व बनावट औषधींच्या पुरवठ्यावरून पुन्हा एकदा रुग्णालयांची तसेच औषधांची खातरजमा करून त्यात दोषींविरुद्ध कडक शिक्षेची अंमलबजावणी व तरतूद आवश्यक आहे. नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात कुत्रा चावल्यानंतर आलेल्या रुग्णांना देण्यासाठी इंजेक्शनच उपलब्ध नसल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

जीव मुठीत घेऊन उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णाला बाहेरच्या खासगी मेडिकलमधून इंजेक्शन विकत आणावे लागत आहे. हा प्रकार नित्याचाच झाला आहे. असाच एक प्रकार निवडणूक प्रचारादरम्यान घडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी नांदेडमध्ये असताना दुपारी तीन वाजता एका ४० वर्षीय महिलेला सभेसाठी जाताना रस्त्यावरील कुत्र्याने चावा घेतला. त्यानंतर त्या महिलेने नांदेडच्या श्यामनगर येथील महिला रुग्णालयात धाव घेतली. त्या ठिकाणी कुत्रा चावल्यानंतर दिले जाणारे इंजेक्शन उपलब्ध नाही, असे रुग्णाला सांगितले . त्यांना शिवाजी पुतळा येथील सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले . त्या ठिकाणी गेल्यावर त्या म हिलेला सांगण्यात आले की, या जखमेवर लागणारे तीन पैकी केवळ दोनच इंजेक्शन येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे तुम्ही येथून आठ किलोमीटर दूर असलेल्या विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात जा. सदरील महिला विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे गेल्यानंतर उपचार करत असलेल्या डॉक्टरांनी सांगितले की, तुम्हाला द्यायचे असलेले इंजेक्शन आमच्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध नाही. तुम्ही ते बाहेरच्या खासगी मेडिकलमधून विकत आणा. ते इंजेक्शन रुग्णाला विकत आणावे लागले. त्यासाठी रुग्णाला ४६०० रुपयांचा खर्च आला. भ्रष्टाचारी व जीवघेण्या कंपनी चालकांविरुद्ध कठोर शिक्षा होणे अत्यंत गरजेचे आहे.

# माणगांव तालुक्यात पदवीधरांकरिता शासकीय नोकरभरती व स्पर्धा परीक्षेकरीता सुसज्ज अभ्यासिका व्हावी

## भाजपा युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांचे आमदार निरंजन डावखरेंना साकडे

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**बोरघर/ माणगाव ( विश्वास गायकवाड )**

माणगांव शहरामध्ये पदव्युत्तर व स्पर्धा परीक्षा/ शासकीय नोकरभरती करीता सुसज्ज अभ्यासिका केंद्र व्हावे अशी मागणी भाजपाचे युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार मा.निरंजनजी डावखरे साहेब यांच्या सुविद्य पत्नी मा.नीलिमाताई डावखरे यांच्याकडे केली असून यावर लवकरात लवकर म ाणगांवकरांचे व नजीकच्या श्रीवर्धन, म्हसळा,तळा तालुक्यातील पदवीधरांचे कित्येक वर्षांचे स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सौ. डावखरे यांनी सांगितले.

आमदार निरंजनजी डावखरे हे सलग तिसऱ्यांदा या मतदार संघातून प्रचंड बहुमतांनी निवडून आले असून लोकसभा झाल्यानंतर तातडीनेच त्यांनी म तदार संघात असणारे भाजपा महायुतीचे कार्यकर्ते, पदवीधर मतदार, शिक्षक संघटना व समविचारी संस्था संघटना यांना संपर्क करून मतदारसंघातील प्रत्येक विधानसभानिहाय दौऱ्याला सुरवात केली आहे, त्याच निमित्ताने त्या माणगांव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळा येथे आलेल्या असताना झालेल्या बैठकीमध्ये भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवानेते निलेश थोरे यांनी सांगितले



कि, माणगांव तालुका हा भविष्यातील रायगड जिल्ह्याचे ठिकाण होणार असून माणगांव शहराम ध्ये सद्यस्थितीला लॉ कॉलेज, BSc Chem,BSc IT, Bsc Nursing, CBSC School, ITI अश्या प्रकारचे विविध विषयांवर पदवी घेण्यासाठी विद्यालये असून तालुक्यातील लोणेरे या गावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ असून तेथे दरवर्षी शेकडो विद्यार्थी अभियांत्रिकी पदवी घेत असतात.

या सगळ्याच विद्यार्थ्यांनी भविष्यात विविध क्षेत्रांमध्ये ज्ञान मिळवावे व MPSC, UPSC, IRS, IFS अशा अनेक स्पर्धा परीक्षा, शासकीय, बँकिंग परीक्षा उत्तीर्ण व्हाव्यात याकरीता मध्यवर्ती ठिकाण म्हणून माणगांव शहरामध्ये सुसज्ज अभ्यासिका व्हावी जेणेकरून भागातील सर्व विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता येईल.

यावर बोलताना सौ. नीलिमा डावखरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत सदरच्या अभ्यासिका केंद्र उभारण्यासाठी थेट केंदशासनाच्या पातळीवरूनही आपण प्रयत्न करू आणि लवकरात लवकर सदरच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील राहू असे सांगितले.

दरम्यान अश्या प्रकारची अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा केंद्र झाले तर माणगांव व परिसरातील श्रीवर्धन, म्हसळा, तळा, रोहा, महाड या तालुक्यानाही याचा थेट लाभ होणार असून आपल्या भागातूनही अनेक अधिकारी घडतील असा विश्वास देखील यावेळी व्यक्त करण्यात आला.

प्रसंगी जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, माणगांव ता.अध्यक्ष गोविंद कासार, श्रीवर्धन ता.अध्यक्ष आशुतोष पाटील, युवा मोर्चा ता. अध्यक्ष प्रणय पेडणेकर, सरचिटणीस जहेंद्र मुंढे, बाबुराव चव्हाण, शिक्षक परिषदेचे पदाधिकारी, आश्रम शाळेचे श्री. भगत सर, श्री. काशिनाथ गाणेकर सर, अशोक यादव, समीर धनसे, चिन्मय मोने, अमोल पवार, महेश पाटील, मंदार मढवी व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ही घटनास्थळी भेट



परभणी प्रकरणावर ज्या ठिकाणी संविधान शिल्पाची विटंबना करण्यात आली होती त्या घटनांस्थळी पाहणी राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजित पवार यांनी केली.

संविधान प्रतिकृती शिल्प कशा पद्धतीचे होते याचे फ्फोटो असतील तर दाखवा अशी विचारणा केल्यावर दैनिक निळे प्रतीक चे प्रतिनिधी संजय बगाटे यांनी मोबाईल मधील चित्र ना अजित पवार यांना दाखवले.

या दरम्यान त्यांनी मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या परिवाराचे व विजय वाकोडे यांच्या परिवाराचे सात्वन केले.

# कॅन्सर उपचारातील प्रगत जनुक सुधारित सेल थेरपी जीएसटीच्या कक्षेबाहेर

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई/प्रतिनिधी**

रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारासाठी आयआयटी मुंबई आणि टाटा कॅन्सर रुग्णालयाने विकसित केलेली प्रगत जनुक सुधारित सेल थेरपी वस्तू व सेवा कराच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय आज झालेल्या वस्तू व सेवा कर परिषदेत घेण्यात आला असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

वस्तू व सेवा कर परिषदेची ५५ वी बैठक दि. २१ – २२ डिसेंबर २०२४ रोजी जैसलमेर, राजस्थान येथे आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या या परिषदेत देशभरातील सर्व राज्यांचे अर्थमंत्री, मंत्री सहभागी झाले आहेत. या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधीत्व मंत्री कु. तटकरे करत आहेत.

याविषयी बोलताना मंत्री कु. तटकरे म्हणाल्या, कर्करोगावर उपचार घेणाऱ्या रुग्णांना शारीरिक, मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातच उपचारातील औषधांचा तसेच विविध पद्धतींचा आर्थिक भार मोठा असतो. आयआयटी मुंबई आणि टाटा कॅन्सर रुग्णालयाने संयुक्तरित्या विकसित केलेली प्रगत जनुक सुधारित सेल थेरपी जीएसटीमधून वगळण्याचा निर्णय आज घेण्यात आला आहे. रक्ताचा कॅन्सर बळावलेला असलेल्या टप्प्यांत रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी ही थेरपी वापरण्यात येते. आजच्या या निर्णयामुळे या थेरपीद्वारे उपचार घेणाऱ्या रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फ्फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनातून महाराष्ट्र राज्याच्या वतीने विविध विषयांवरील सुधारणा, बदलांबाबत या परिषदेत मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. आरोग्य सुविधा आणि सुलभ उपचाराच्या दृष्टीने कर्करोगाच्या उपचारासाठी असलेली थेरपी कराच्या कक्षातून वगळण्याची विनंती करण्यात आली होती, त्यास परिषदेने मान्यता दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्राच्या मागणीला यश, मनुक्याला कृषी उत्पादनाचा दर्जा: वस्तू व सेवाकरातून सूट मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई/प्रतिनिधी**

द्राक्षापासून तयार होणाऱ्या मनुक्याला कृषी उत्पादनाचा दर्जा देत वस्तू व सेवा करातून वगळण्याच्या महाराष्ट्राच्या मागणीला यश आले असून वस्तू सेवा कर परिषदेतमध्ये मनुका करमुक्त करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

वस्तू व सेवा कर परिषदेची ५५ वी बैठक दि. २१ – २२ डिसेंबर २०२४ रोजी जैसलमेर, राजस्थान येथे आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या या परिषदेत देशभरातील सर्व राज्यांचे अर्थमंत्री, मंत्री सहभागी झाले आहेत. या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधीत्व मंत्री आदिती तटकरे करत आहेत.

हळद, गुळ याप्रमाणेच मनुके कृषी उत्पादन असल्याने त्याला वस्तू व सेवा करातून वगळण्याची शिफ्फारस मंत्री आदिती तटकरे यांनी केली होती. त्यास परिषदेत मान्यता देण्यात आल्याने या आधी ५ टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) असणारे मनुके आता करमुक्त झाले आहेत.

मनुका, बेदाणे, हळद, गुळ हे महाराष्ट्र मुल्यवर्धित करात (चतअढ) करमुक्त होते. मनुका या अपवादाव्यतिरिक्त इतर सुकामेवा कराच्या कक्षेत येत होता. इतर कुठलीही प्रक्रिया न करता केवळ द्राक्षे सुकवून मनुके तयार करण्यात येतात. त्यामुळे याला कृषी उत्पादनाचा दर्जा देत सध्याच्या ५ टक्के कर कक्षेतून वगळण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीवर सकारात्मक निर्णय होउन शेतकऱ्यांकडून विक्री होणारे मनुके करमुक्त झाले आहेत.

याबाबत बोलताना मंत्री कु. तटकरे म्हणाल्या की, कुठलीही प्रक्रिया न करता इतर शेती उत्पादनाप्रमाणेच मनुका शेतकऱ्यांकडूनच तयार करण्यात येतो. त्यामुळे कृषी उत्पादन दर्जा देत करमुक्ती मिळाल्याचे समाधान आहे. राज्यातील नाशिक, सांगली अशा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मनुक्याचे उत्पादन होते तसेच महिला बचत गटही यात मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. या परिषदेसाठी मार्गदर्शन करत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानते.

# संजय शिरसाठ यांची सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मंत्रीपदी निवड



**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

चालू घडामोडींमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मंत्रीपदावर मा. ना. संजय शिरसाठ यांची निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे अनुसूचित जाती, आदिवासी, वंचित आणि मागासवर्गीय समाजाच्या हितासाठी काम करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे.

संजय शिरसाठ हे शिवसेना पक्षाचे (शिंदे गटाचे) प्रमुख नेते असून, त्यांनी आतापर्यंत आपल्या कारकिर्दीत समाजहितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यांच्या कामाचा मुख्य भर वंचित समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी लढा देणे आणि गरजूंना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे यावर राहिला आहे.

त्यांच्या या नेमणुकीबद्दल समाजातील अनेक कार्यकर्ते आणि नेते मंडळींनी आनंद व्यक्त केला आहे. अनुसूचित जाती व वंचित समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या नेमणुकीकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

# परभणी प्रकरणात सरकारचे स्पष्टीकरण व वस्तुस्थिती वेगळी आहे – शरद पवार



**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**परभणी/संजय बगाटे**

परभणीतील संविधान शिल्प विटंबनेच्या घटनेनंतर आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी मयत सोमनाथ सूर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले. घटना स्थळाची पाहणी करून त्यांनी आंबेडकरी संविधानप्रेमी जनतेच्या धरणे आंदोलनालाही भेट देउन त्यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या परिवाराचे व विजय वाकोडे यांच्या परिवाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर साहजिकच यात सत्यता वाटत असल्याचे ते म्हणाले.

विधिमंडळात परभणी प्रकरणावर राज्य सरकारने जे मांडले ते आणि वस्तुस्थिती वेगळी आहे असेही ते म्हणाले. आपण ज्या मागण्या केल्या आहेत त्या राज्य सरकारने शंभर टक्के पूर्ण कराव्यात. यासाठी राज्य सहकार बरोबर बसून आम्ही चर्चा करू. न्याय मिळाला पाहिजे या बाबत आम्ही प्रयत्नशील आहोत. चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे आंदोलनकर्त्या आंबेडकरी समाजाला सोमनाथ सूर्यवंशी यांच्या परिवाराला व लोकनेते विजय वाकोडे यांच्या परिवाराला नागरीकांना सर्वांना न्याय्य मिळाला पाहिजे असे ते म्हणाले. यांच्या समवेत राज्यसभा सदस्य डॉ. फौजिया खान, खा बजरंग सोनवणे, माजी मंत्री राजेश टोपे, सुरेश वरपुडकर, विजय गव्हाणे, भिमराव हत्तीआंबिरे, सिद्धार्थ हत्तीआंबिरे उपस्थीत होते.

# बार्टीकडून संत गाडगेबाबा महाराज स्मृतिदिनी अभिवादन



**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**वसमत/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे हिंगोली जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यादव गायकवाड, सिद्धार्थ गोंवदे मार्गदर्शनाखाली समतादूत मिलिंद आळणे, गुरुनाथ गाडेकर अध्यक्षस्थानी मरीबा मोरे हे होते.

प्रमुख पाहुणे मिलिंद आळणे गुरुनाथ गाडेकर हे होते सर्वप्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले . संत गाडगेबाबा यांची ६८वी पुण्यतिथी आहे. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. गाडगेबाबा हे कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक म्हणून ओळखले जातात. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते, आणि त्यांचा जन्म २३ फ्फ्रेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला होता. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. ते स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कार्यरत होते. त्यांच्या कीर्तनशैलीत परखड बोली आणि स्वच्छतेचा संदेश होता. १४ नोव्हेंबर १९५६ रोजी पंढरपूर येथे त्यांचे अखेरचे कीर्तन झाले, आणि २० डिसेंबर १९५६ रोजी पेढी नदीच्या काठावर वलगाव (अमरावती) येथे त्यांचे निधन झाले.

यावेळी मिलिंद आळणे, गुरुनाथ गाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन संतोष पारखे यांनी केले. मरिबा मोरे, ग्यानोजी हरबाळे गौरव कोचार, प्रणव आळणे, जयशिल मेंढे, जनराज इंगोले, सचिन आदी मोठया संख्येने नागरिक उपस्थित होत्या.

# ‘मविआ’त बिघाडी? महापालिकेच्या निवडणुकीबाबत ठाकरे गटाचे स्वबळाचे संकेत

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई/प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. तर दुसरीकडे महाविकास आघाडीला मिळालेल्या अपयशासंदर्भात आता आघाडीच्या नेत्यांकडून त्यावर विचारमंथन करण्यात येत आहे. असं असताना आता आगामी महापालिकेच्या निवडणुकीची तयारी सुरु करत पक्षबांधणी करण्यास विरोधकांनी सुरुवात केल्याचं पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवरच बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्यासंदर्भात कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचं सूचक केलं. त्यांच्या या विधानामुळे शिवसेना ठाकरे गट महापालिका निवडणुका स्वबळावर लढणार का? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. तसेच संजय राऊत यांच्या या विधानानंतर आता काँग्रेसच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. आज काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही सूचक भाष्य केलं आहे. ङ्गत्यांच्या (ठाकरे गट) पक्षाची जशी इच्छा असेल तशी आमचीही इच्छा असेल, अशी सूचक प्रतिक्रिया विजय वडेट्टीवार यांनी दिली.

महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याच्या संजय राऊत यांच्या विधानासंदर्भात विजय वडेट्टीवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, ङ्गत्यांची (ठाकरे गट) काय इच्छा आहे? ती त्यांचा प्रश्न आणि आमची काय इच्छा आहे ते आम्ही त्यावेळी (महापालिका निवडणुकीवेळी) पाहूयात. आजतरी आम्ही महापालिका निवडणुका कशा लढवायच्या? यासंदर्भात विचार केला नाही.

पण आम्हाला वाटतं की महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढलं पाहिजे. पण त्यांच्या (ठाकरे गट) पक्षाची तशी इच्छा असेल तर तशी आमचीही असेलङ्घ, असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं.

**संजय राऊत काय म्हणाले होते?**

मुंबई महापालिकेवर आम्हाला शिवसेनेची सत्ता आणावी लागेल अन्यथा मुंबई वेगळी होईल. मराठी माणसांवर कसे हल्ले सुरु झाले आहेत, तुम्ही सगळे पाहात आहात. मुंबई आम्ही स्वतंत्रपणे लढलो किंवा महापालिका निवडणुकी स्वतंत्रपणे लढलो याचा अर्थ महाविकास आघाडी तुटली असं नाही.

मुंबई ओरबाडली जाते आहे ती जर आमच्या हातून गेली तर मुंबई वेगळी केली जाईल. मी हे म्हणत नाही की आम्ही स्वतंत्रपणे लढू ही कार्यकर्त्यांची भावना आहे. आमची चर्चा सुरु आहेङ्घ, असं संजय राऊत यांनी म्हटलं.

**जयंत पाटील काय म्हणाले?**

खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्यासंदर्भात कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचं सूचक विधान केलं.

संजय राऊत यांच्या या विधानाबाबत जयंत पाटील यांना विचारलं असता जयंत पाटील यांनी आपण त्यांचं विधान काय आहे ते ऐकतो आणि नंतर प्रतिक्रिया देईन, असं म्हणत अधिक बोलणं टाळलं.

पान २ वरून

# पुरातत्त्व अधिकारीला सायबर चोरांचा ११.९९ लाखांचा गंडा

सुप्रीम कोर्टाची फी म्हणून ९९ हजार रुपये भरण्यास सांगितले. तसेच ११ लाख रुपये एका बँक खात्यावर आरटीजीएस करण्यास भाग पाडले. ९ डिसेंबरपासून पैसे पाठवल्यानंतरही, आरोपीने पुन्हा ११ व १२ डिसेंबर रोजी फ्फोन करून बँकेतील कर्जाची चौकशी करण्यास सांगितले. मित्रांकडून पैसे उसने घेण्यासही सांगितले. त्यावरून सोनोने यांना फ्फसवणुकीची शंका आली. १३ डिसेंबर रोजी त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून उपनिरीक्षक शंकर डुकरे प्रकरणाचा तपास करत आहेत. सायबर गुन्हेगारांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केलेली ही फ्फसवणूक अनेकांसाठी धोक्याचा इशारा आहे.

# गुरुप्रसाद ज्वेलर्सची लूट: पाच दिवसांची रेकी, वेबसिरिजचा प्रभाव ओणि एका फरार सूत्रधाराची गोष्ट

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरच्या शांत सातारा परिसरात बीड बायपासजवळ एक साधं पण विश्वासार्ह नाव असलेलं दुकान होतं – गुरुप्रसाद ज्वेलर्स, सोन्याच्या चमचमणाऱ्या दागिन्यांसह, हे दुकान परिसरातील अनेकांचं आवडतं होतं. मात्र, १९ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री, या दुकानावर अशा एका घटनेने धैमान घातलं, ज्यामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली.

लूट सुरू होण्यापूर्वीची तयारी

या घटनेच्या पाच दिवस आधीच सगळं ठरलं होतं. चार मित्रांनी मिळून या लुटीचा कट स्वला होता. यामध्ये प्रमुख भूमिका बजावत होता लकी सुभाष तावडे. तकी हा फक्त गुन्हेगारच नव्हे, तर एक हुशार सूत्रधार होता. त्याला याची चांगलीच जाणीव होती की, अशा प्रकारची योजना आखण्यासाठी फ्फक्त सध्या माहितीपुरती गोळा करणे पुरेसे नाही. म्हणूनच त्याने आपल्या साथीदारांना पाठवून गुरुप्रसाद ज्वेलर्सचं बारकाईनं निरीक्षण करण्यास सांगितलं. संदीप घोडेराव, राहुल शिरसाठ, आणि अनुकूल पवार या तिघांनी पाच दिवस रेकी केली. त्यांनी दुकानाचे तास, ग्राहकांची संख्या, आणि दुकानमालक सुरेश कुलते यांची दिनचर्या यावर लक्ष केंद्रित केलं. लकीने ही पोजना बनवताना एक वेबसिरिजही पाहिली होती, ज्यातून त्याने धाडसी चोरीचं शिकून घेतलं.

**शेवटचं आव्हान**

लकीच्या अटकेनंतरच या गुन्ह्याचं संपूर्ण कोडं उलगडेल. सातारा पोलिसांच्या तपासामुळे चार आरोपी तुरुंगात आहेत, पण सूत्रधाराच्या अटकेनेच या प्रकरणाचा शेवट होईल. शहरात अजूनही लोकांमध्ये भीती आहे, पण पोलिसांची मेहनत पाहून न्याय मिळेल याची खात्री आहे. ही गोष्ट फ्फक्त एका लुटीची नाही, तर गुन्हेगारीतील डिजिटल प्रभाव, योजना आखण्याच्या पद्धती, आणि पोलिसांच्या धाडसी तपासाची कहाणी आहे.

**घटनेचा दिवस**

१९ नोव्हेंबर हा दिवस नेहमीसारखाच होता. सुरेश कुलते यांनी सकाळी आपलं दुकान उघडलं, नेहमीसारखं ग्राहकांचं स्वागत केलं आणि दिवसभर काम केलं. सायंकाळी, ते दुसऱ्या दुकानातून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम एका बॅगमध्ये घेऊन आले. ते दुकान बंद करण्याच्या तयारीत होते. अचानक, दोन चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. त्यांच्या चेहऱ्यावर काहीच भाव नव्हते, पण हातातल्या पिस्तुलाचा धाक पुरेसा होता. ‘कुठेही हालचाल केली, तर जीव गमवाल,‘ असं सांगत त्यांनी काउंटरवर ठेवलेली बॅग उचलली आणि क्षणात दुकानाबाहेर पळ काढला.

**पोलिसांची तपासणी**

घटनेनंतर सातारा पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. लुटलेल्या सामानाची एकूण किंमत ११ लाख ६४ हजार ७१६ रुपये होतो. चोरीत वापरलेल्या पद्धतींनी पोलिसांना हे सामान्य गुन्हेगार नसून योजना आखून गुन्हा करणाऱ्या टोळीचा कारभार असल्याचं स्पष्ट झालं. महिनाभराच्या तपासानंतर, पोलिसांनी प्रथम अनुकूल पवारला ताब्यात घेतलं. त्याच्यावर विचारपूस करताच, इतर आरोपींची नावे समोर आली – कार्तिक ऊर्फ्फ रवी सुभाष तावडे, संदीप घोडेराव आणि राहुल शिरसाठ पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून दोन दुचाकी, पिस्तुल, आणि जिवंत काडतुसे जप्त केली. मात्र, लकी सुभाष तावडे या लुटीचा मुख्य सूत्रधार अद्याप फरारी आहे.

**लकीची भूमिका आणि पुढील तपास –** लकी हा कार्तिकचा मोठा भाऊ असून, त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. या लुटीत मुख्य भूमिका बजावताना त्याने आपल्या दिल्लीतील दोन शार्पशूटर मित्रांना पिस्तुलीची जबाबदारी सोपवली होती. पोलिसांनी कार्तिकच्या घराची झाडाझडती घेतली, मात्र काहीही हाती लागलं नाही. लकीचा ठावठिकाणा अद्याप अज्ञात आहे, पण अटक आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार, लुटलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लकीकडेच असल्याचा अंदाज आहे.

**लुटलेला ऐवज**

या लुटीत विविध प्रकारचे सोन्याचे दागिने लुटले गेले होते. यामध्ये सोन्याचं गंठण, मंगळसूत्र, फॅन्सी टॉप्स, पदकं, कुडकं, अंगठ्या, ओम पान, झुंबड जोड, आणि ५७ हजारांची रोख रक्कम यांचा समावेश होता.